प्रेसनोट दिनांक –०५/०९/२०२३

**आरोपीत १) अशोककुमार सुर्यबंशराय, वय ३४ वर्षे, फिल्ड सुपरवायझर, शहा टेकनीकल कन्सलटंन्स अंधेरी मुंबई, सध्या कार्यरत –मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) सुर्यानगर, कासा ता.डहाणु जिल्हा पालघर (कंत्राटी) २) शाहिद सलीम वारसी, वय २५ वर्षे सुपरवायझर, श्री.गणेश कंपनी नाशिक (खाजगी इसम) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद कमांक | कासा पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम 7 A, 12 प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आरोपीत १) अशोककुमार सुर्यबंशराय, वय ३४ वर्षे, फिल्ड सुपरवायझर, शहा टेकनीकल कन्सलटंन्स अंधेरी मुंबई, सध्या कार्यरत –मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) सुर्यानगर, कासा ता.डहाणु जिल्हा पालघर (कंत्राटी) २) शाहिद सलीम वारसी, वय २५ वर्षे सुपरवायझर, श्री.गणेश कंपनी नाशिक (खाजगी इसम)** |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ५,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रूपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे डहाणु जिल्हा पालघर याठिकाणी केबल नेट सर्विस प्रोव्हायडर म्हणुन व्यवसाय करीत असुन डहाणु तालुक्यातील एम.एम.आर.डी.ए.च्या अखत्यारीतील इलेक्ट्रीक पोलवरून टाकलेली नेट ऑप्टीक फायबर केबल पुर्ववत ठेवण्यासाठी यातील आरोपी क्र.१ यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/–रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक ०५/०९/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०५/०९/२०२३ रोजी पंचासमक्ष आलोसे हे लाचेच्या रक्कमेची मागणी करतात अगर कसे याची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचे डहाणु तालुक्यातील एम.एम.आर.डी.ए.च्या अखत्यारीतील इलेक्ट्रीक पोलवरून टाकलेली नेट ऑप्टीक फायबर केबल पुर्ववत ठेवण्यासाठी आरोपी क्र.१ यांनी ते एम.एम.आर.डी.ए. चा अधिकारी असल्याचे भासवुन एम.एम.आर.डी.ए.च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना द्यावे लागतात असे सांगुन ५,०००/– रूपयाची लाचेची मागणी करून ती आरोपी क्र.२ यांचेमार्फतीने स्विकारली असता दोन्ही आरोपी यांना १७:२० वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ – acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल – dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार – ––
ॲप्लीकेशन – acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी कमांक – 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. – 9423884745, 9404218543

५/९/२३
(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

पोलीस उप अधीक्षक
सत्यमेव जयते